# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

विषय: बँकेच्या ७२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी महानगरपालिका कर्मचारी जे बँकेचे सभासद आहेत त्यांना कामकाजाच्या वेळेत सभेस उपस्थित राहण्यास सवलत मिळण्याबाबत.

महाव्यवस्थापक, दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई यांच्या दि.२९ जुलै, २०२४ च्या पत्राच्या अनुषंगाने जे महानगरपालिका कर्मचारी सदर बँकेचे सभासद आहेत अशा महानगरपालिका कर्मचा-यांना बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी शुक्रवार, दि.३० ऑगस्ट, २०२४ दुपारी ३.०० वाजता कार्यालय सोडण्यास मा.महानगरपालिका आयुक्त यांनी क्र.एमजीसी /एफ/३८७९ दि.०३.०८.२०२४ अन्वये मंजूरी दिली आहे.

तद्अनुषंगाने बँकेच्या सभासद असणा-या कर्मचा-यांनाच, शुक्रवार दि.३० ऑगस्ट, २०२४ रोजी श्री शिवाजी मंदिर, न.चिं.केळकर पथ, दादर (प),मुंबई-४०००२८ येथे होणा-या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी दुपारी ३.०० वाजता कार्यालय सोडण्याची सवलत देण्यात येत आहे.

सदर परिपत्रक महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in आणि https://mybmcemp.mcgm.gov.in/circulars या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| सही/-१२.०८.२०२४ | सही/-१२.०८.२०२४ |
| (श्रीम.रिमा सु.ढेकणे) | (श्री.मिलिन सावंत) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | सह आयुक्त (सामान्य प्रशासन) |

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
क्र.प्रकअ/१२२/सर्वसा(एमओपी/२३४)
दि. १९.०८.२०२४

प्रत--------------------------------------------- यांना (--------जादा प्रतींसह) माहितीकरिता व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

19.8.

(श्रीम.अ.वि.भिवंदे)
प्रशासकीय अधिकारी (आयुक्त)
महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय

**दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई.**
**मुंबई - ४०० ००१.**

संदर्भ क्र./एमसीबी/जीएम/ २२८/ २०२४-२०२५ दिनांक : २९.०७.२०२४

**टिप्पणी**

**विषय : बँकेच्या ७२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी महापालिका कर्मचारी जे बँकेचे सभासद आहेत त्यांना कामकाजाच्या वेळेत सवलत मिळणेबाबत.**

आदरणीय महोदय,

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई यांची बाहत्तरावी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक ३० ऑगस्ट २०२४ रोजी, सायंकाळी ५.०० वाजता श्री शिवाजी मंदिर, न.चिं. केळकर पथ, दादर (प.), मुंबई-४०० ०२८ येथे आयोजित करण्यात आली आहे.

शुक्रवार दिनांक ३० ऑगस्ट २०२४ हा बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचा-यांच्या कामकाजाचा दिवस असल्याने महानगरपालिका कर्मचारी जे बँकेचे सभासद आहेत त्यांना त्या दिवशी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर राहणे शक्य होणार नाही.

बँकेच्या सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर राहता यावे, याकरीता महानगरपालिका प्रशासनाने यापूर्वी त्यांना त्यांच्या कामाच्या वेळेत सवलत दिलेली आहे. तरी बँकेच्या सभासदांना, शुक्रवार दिनांक ३० ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्याकरीता दुपारी ३.०० वाजता कार्यालय सोडण्याची परवानगी देण्यात यावी, ही नम्र विनंती.

आपल्या मंजूरीकरीता सविनय सादर.

वि.डी. रायकर
महाव्यवस्थापक

**मा. सह-आयुक्त (परिमंडळ-४) तथा बँकेचे मा. कार्याध्यक्ष -**

महोदय,

महाव्यवस्थापक, दि म्युनिसिपल को-ऑप.बँक लि.,मुंबई यांनी उपरोक्त नमूद केलेल्या टिप्पणीच्या अनुषंगाने, शुक्रवार दिनांक ३० ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता आयोजित करण्यात आलेल्या बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासदांना उपस्थित राहण्याकरीता दुपारी ३.०० वाजता कार्यालय सोडण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे.

आपल्या मंजूरीकरीता सविनय सादर.

MPC/6224/PR
29.07.24

29/7/24

**सह-आयुक्त (परिमंडळ-४) तथा**
**बँकेचे कार्याध्यक्ष**

**मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका**
**तथा बँकेचे मा. पदसिध्द अध्यक्ष**

प्र.क.अ.
पुढील कार्यवाहीसाठी

3/8
महानगरपालिका आयुक्त
सह आयुक्त (सा.प्र.)

2/8/24
सह आयुक्त
(सामान्य प्रशासन)